ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - X Issue - II April - June - 2021

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | कोविड-१९ च्या टाळेबंदीच्या काळातील महिलांवर होणारा घरगुती हिंसाचार<br>**प्रा. डॉ. माधुरी ना. कोकोडे** | ७१-७८ |
| १४ | कोविड-१९ काळात शालेय बालकांचे कौटुंबिक समायोजन-एक अध्ययन<br>**सौ. मेघा मोहन रतकंठीवार**<br>**डॉ. माधुरी नामदेव कोकोडे** | ७९-८५ |
| १५ | कोविड-१९ मधील समाजातील विविध सामाजिक समस्यांचे अस्तित्व<br>**डॉ. मिथुन बाबुराव राऊत** | ८६-८९ |
| १६ | कोरोना एक सामाजिक बदलांची नांदी<br>**Asst. Prof. Dr. Nita Rameshwar Kalaskar** | ९०-९९ |
| १७ | कोरोना काळ आणि दलित अत्याचार<br>**प्रशांत घोडवाडीकर** | १००-१०४ |
| १८ | वर्तमान समाजात समाजशास्त्र विषयाचे महत्व आणि व्यवसायिक उपयुक्तता: एक सामाजिक अध्यन<br>**प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे** | १०५-१०९ |
| १९ | भारतीय समाजात प्रचलित असलेल्या प्रमुख समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा. डॉ. संजय श्रीहरी कुंभारे** | ११०-११४ |
| २० | स्त्रियांचा स्तर उंचावण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची भूमिका<br>**सतीश गोवर्धन पेटकर** | ११५-११९ |
| २१ | ग्रामीण विकासात शासन आणि प्रशासनाची भुमिका: विशेष संदर्भ 'जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा'<br>**प्रा. निलंगेकर एस. एस.** | १२०-१२२ |
| २२ | लॉकडाउन मधील कौटुंबिक लैंगिक हिंसाचाराचे सामजशास्त्रीय विश्लेषण<br>**Sneha Ramraoji Wasnik** | १२३-१२८ |
| २३ | ग्रामीण महिला, राजकीय नेतृत्व आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. विजय शंकरराव दिघोरे** | १२९-१३२ |
| २४ | कोवीड-१९ च्या दुसऱ्या लाटेमुळे सामाजिक संस्थांची बदलती स्थिती<br>**प्रा. धर्मदास व्हि. घोडेस्वार** | १३३-१३८ |

VOLUME - X, ISSUE - II - APRIL - JUNE - 2021
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)** **AP-9**

# २३. ग्रामीण महिला, राजकीय नेतृत्व आणि आव्हाने

**प्रा. डॉ. विजय शंकरराव दिघोरे**
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर, जि. नागपूर.

स्त्री हा समाजाचा मूलभूत घटक आहे. नवी पिढी घडविणारी, कुटुंब व्यवस्थेला आकार देणारी, घराघरात सुसंवाद राखण्यासाठी अहोरात्र धडपणारी ती संसाराची केंद्रबिंदू आहे. ज्या समाजात स्त्रीचे स्थान महत्त्वाचे, आदराचे तितका तो समाज सभ्य व सुसंस्कृत मानला जातो. पूर्वीच्या स्त्रीमध्ये व आजच्या प्रगत स्त्रीमध्ये जमीन अस्मानचा फरक पडल्याचे जाणवते. पूर्वीची स्त्री मग ती शहरी असो वा ग्रामीण, तिच्या जीवनमानात, विचारात,परिस्थितीत आज आमूलाग्र बदल झालेला दिसतो. ग्रामीण भागाचा विचार करता पूर्वी स्त्रीचे स्थान दुय्यम स्वरुपाचे असून तिला चूल–मूल, सासर–माहेर याच्यामध्येच ती अडकून पडल्याने लक्षात येते. माहेरापासूनची अलिप्तता व सासरपासून मिळालेला जाचक त्रास यांनी ती पोखडून गेल्याचे मागच्या काळावरुन दिसून येते. मनुऋषीने 'मनुस्मृती' मध्ये म्हटल्याप्रमाणे, "स्त्रियांचा विवाह हाच एकमेव संस्कार असून पतीसेवा करीत पतीच्या घरी राहणे व सकाळ–संध्याकाळ स्वयंपाक करणे हाच त्यांचा होमयज्ञ होय" अशी दयनिय स्थिती महिलांची झाल्याचे लक्षात येते. महानुभव संप्रदाय काळात 'चित्रीचे स्त्री न पहावी' तर वारकरी संप्रदाय काळात 'स्त्री म्हणूनी न व्हावे उदास' अशी मनाची समजूत घालतांना संत जनाबाई व्यक्त होते. वारकरी संप्रदाय काळात स्त्री भक्तीचा मार्ग खुला असलातरी किंवा आध्यात्मिक लोकशाही निर्माण झाली असली तरी प्रत्यक्षात मात्र स्त्रीची पूर्ण स्वतंत्रता याला कुठेही महत्त्व दिल्याचे लक्षात येत नाही स्त्रिला कुठे केवळ देवता रुप बहाल केले तर काही ठिकाणी तिला शोभेची वस्तू म्हणून मिरवल्या गेले. तिचे जीवन म्हणजे झाडावरील वेलीप्रमाणे बनल्याचे दिसून येते. मात्र आजच्या काळात बऱ्याच प्रमाणावर या स्थितीत बदल झाला आहे. त्यामध्ये समाजसुधारक, संताचे कार्य, शिक्षणप्रणाली या सर्वाचा मोठा हातभार लाभल्याचे म्हणता येईल.

**ग्रामीण महिला व राजकीय नेतृत्व**

1940 ते 1980 हा कालखंड एकूण ग्रामीण जीवनातील स्थित्यंतराचा आणि संक्रमणाचा काळ मानला जातो. 1947 ला भारत देश स्वतंत्र झाल्यावर पहिल्याच पंचवार्षिक योजनेत कृषिक्षेत्रासंबंधीत बांधप्रकल्प, सिंचन व सामुदायीक विकास यावर जवळपास 50% वर भर देण्यात आला. त्यानंतरच्या येणाऱ्या दुसऱ्या, तिसऱ्या, पाचव्या पंचवार्षीक योजनामध्ये कृषिविकासावर आधारित उद्योगधंदे, सामाजिक सेवा, कृषिउत्पादनातील विशिष्ट अन्नधान्यावर भरत्याचबरोबर ग्रामीण भागातील गरीबी हटाव, सामाजिक स्तर उंचावण्याकरिता विशेष लक्ष दिल्या गेले. त्याचाच परिणाम म्हणजे ग्रामीण परीसरातील सर्वच घटकांवर झाला. ग्रामीण महिल्याचे जीवनमान सुधारण्यास त्यातून मदत मिळाली असे म्हणायला हरकत नाही. कारण कृषिक्षेत्रातील विकासातून कुटुंबाचा आर्थीक, सामाजिक, स्तर उंचावला गेला. पूर्वीपासूनच भारत देशाचा विचार करता ग्रामीण भागातील स्त्रिया हया कृषिजीवनाचा पाठीचा कणा ठरल्या आहेत. या कृषिक्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीतच नव्हे तर पूर्वीपासूनच स्त्रियांचा मोठा सहभाग असलेला दिसतो,

मग ते दक्षिण भारत असो की उत्तर भारत. पुढच्या काळात ही ग्रामीण स्त्री कृषिक्षेत्राबरोबर राजकीय, सामाजिक क्षेत्रात हळूहळू पदार्पण करु लागली. जुन्या रुढी परंपरांना झुगारुन आरोग्याविषयी जाण तिच्यामध्ये निर्माण झाली. ग्रामीण भागातील शिक्षण प्रसारामुळे तिच्या जीवनाला वेगळे वळण प्राप्त होऊन ती अनेक व्यवसायात पदार्पण करुन सक्षमपणे समाजात वावरण्याचा प्रयत्न करु लागली. स्त्रिया आज सर्वक्षेत्रात आघाडी घेत आहेत. दहावी आणि बारावी परीक्षेपासून अंतराळातील झेप पर्यंत ती पोचली आहे. अंजली कुलकर्णी आपल्या 'स्त्री स्वत्वाचा शोध' या ग्रंथात स्त्रिचा बदलता प्रवास व्यक्त करताना म्हणतात, "जसजशी स्त्री शिकत गेली तसतशी तिची स्वतःच्या आयुष्याविषयीची कल्पना बदलत गेली. तिच्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत गेला. स्त्रीविषयक कायद्यांनी तिला कुटुंबात, संरक्षण मिळाले. स्त्रीमुक्ती चळवळीमुळे तर स्त्रीजीवनाच्या प्रत्येक पैलूचा अभ्यास, विचार केला गेला. नोकरी व्यवसायामुळे तिचा आत्मविश्वास वाढला या सगळयात स्त्रीची जीवनशैली, तिचे समाजातील स्थान, तिची राहणी, तिची समाजातील कुटुंबाबाहेरच्या घटकांशी सुरु झालेली interaction यामध्ये हळूहळू बदल होत गेले. या सगळया संदर्भात स्त्रीवर असलेल्या जुन्या बंधनांचा त्रास थोडा थोडा कमी होऊ लागला. तरीही स्त्री पूर्णपणे मुक्त झाली नाही. तिच्यामोवतीच्या बेडया पूर्णपणे निघाल्या नाहीत. अजूनही पुरुषी मानसिकतेचा अंमल तिच्या शरीर मनावर आहे"[1] येथे समाज वास्तव व्यक्त झाले आहे. त्यामुळे त्यांचे मत यथार्थ वाटते.

ग्रामीण स्त्रियांनी बचत गटाच्या माध्यमातून आपली प्रगती साधून स्वतःला आर्थीकदृष्टया सक्षम बनविले आहे. यासाठीची शासनाची भूमिकाही महत्त्वाची ठरली आहे. शासनाने बचत गटासाठी केलेली मदत जागोजागी प्रत्ययास यत. स्वयमांसध्दा या उपक्रमाच्या माध्यमातून आज जवळपास 9,30,000 स्त्रियांनी स्वविकास घडवून आणला आहे. "आज साक्षरतेमध्ये भारतातील महिलांची स्थिती शहरी 79-10%तर ग्रामीण स्तरावर 57-9% (7वर्ष व वरील महिला) अशी आहे"[2] याचाच अर्थ शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण स्त्री शिक्षणात कमी आहे. त्यामुळे राजकीय नेतृत्त्वाच्या बाबतीतही ती कमी पडलेली दिसून येते.

भारतात जगातील सर्वात मोठी लोकशाही अस्तित्वात आहे. लोकशाहीत समता, स्वातंत्र्य, बंधुता, हक्क व कर्तव्ये या तत्वाचा खऱ्या अर्थाने उपयोग करुन घेण्यास ग्रामीण भागातील स्त्रिया समोर येत नाही. आपल्या अधिकाराचा वापर करण्यास ग्रामीण स्त्रिया धजावत नाही. त्याचे कारण म्हणजे त्याबाबतचे अज्ञान होय. आणि ज्या स्त्रियांना त्याबाबतची महत्त्व लक्षात आली. मात्र त्यांना त्यांच्या मार्गात पुरुषी मानसिकता आड आल्याचे दिसते. ज्या प्रमाणात ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाला. त्या तुलनेत स्त्रिवर्गाने प्रगती केली. मात्र त्याप्रमाणात त्यांनी आपल्या धिकाराचा वापर केलेला दिसत नाही. या मागे सामाजिक परंपरा, रुढी असल्याचे सांगता येईल.

ग्रामीण भागातील स्त्रियाचा विचार केला असता असे लक्षात येते की, आज ग्रामीण स्त्रिया सरपंच ते उच्चपद पर्यंतचा प्रवास कमण करीत आहे. मात्र त्याप्रमाणात त्याच्यामध्ये निर्णय घेण्याची क्षमता विकसित व्हायला हवी. ती पूर्णता झाली, नसून स्वयंभू निर्णय पध्दतीचा अभाव त्यांच्यामध्ये जाणवतो. त्यांच्या घरातील पुरुषांच्या विचाराने त्या राजकारणात सहभाग घेऊन कारभार करीत. राहतात. त्यामुळे राजकारण अधिक सक्षम बनू शकत नाही. निसर्गाने स्त्री–पुरुष समान बनविले असले तरी समाजाने, तेथील परंपरानी तिला दुय्यम स्थान बहाल केले आहे. रुढी, परंपराचा हा पगडा ग्रामीण भागातून एकदम मिटविणे सहज शक्य होत नाही. कौटुंबिक जबाबदाऱ्या व सामाजिक

आव्हानांना सामोरे जाताना नेमकी कोणती भुमिका घ्यावयाची याविषयीचा संभ्रम व गोंधळाची अवस्था तिची आहे. कौशल्य तिच्या अंगी असले तरी अनुकूल परीस्थिती अभावी मागासलेपणा तिच्या वाटयाला येत आहे. ग्रामीण स्त्रियांच्या बाबतीतील असलेली शैक्षणिक उदासिनता देखील त्यांला कारणीभूत आहे.ग्रामीण स्त्रियांना आरक्षणांमधुन सहभाग मिळत आहे. परंतु तिला योग्य प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे, जेणेकरुन आपल्या जबाबदाऱ्या योग्य रितीने हाताळतांना अडचणी जाणार नाहीत.

आज 1000 पुरुषाच्या मागे 759 स्त्रीया आहेत. 1991 मध्ये 945 होत्या, 2009 मध्ये ही संख्या 927 अशी होती घराघरातून स्त्रीवर पावित्र्याच्या, पत्नीव्रतेच्या कथा तिच्या मनावर बिंबवल्या जातात, परंतु प्रत्यक्षात असलेल्या त्या स्त्रिची जिद्द मेहनत यांचे फारसे कोणी कौतुक करीत नाही. ते तिचे कर्तव्यच आहे. असे म्हणून तिला आपल्या कार्यात प्रोत्साहन दिले जात नाही. त्याचाच काही प्रमाणात परीणाम म्हणजे त्या स्त्रिया राजकारणात सहभाग घेण्यास उत्सूक राहत नाही. राजकारणात प्रवेश करताना तिला अनेक छोटया मोठया अडचणीत तोंड देत रहावे लागते. तसेच राजकारणातील शासनाची किचकट प्रकिया हाताळणे ग्रामीण स्त्रियांना शक्य होतनाही. त्याकरीता साधी सोपी यंत्रणा आणणे गरजेचे आहे.

असे असले तरी शासनाच्या आकडेवारीचा विचार पाहता मध्ययुगीन काळापेक्षा आजची स्त्रियांची परीस्थिती उज्ज्वल असलेली दिसते. ß2014 लोकसभा निवडणूकीमध्ये पुरुषाचा सहभाग 65-63% तर स्त्रीयांचा 67-9% एवढा होता"[3] येथे स्त्रियांचा राजकारणातील सहभाग लक्षात येतो. त्याचबरोबर स्त्रीयांचा निवडणूक प्रकिया, सार्वजनिक सरकारी–निमसरकारी, खाजगी क्षेत्रात तसेच विविध राजकीय पक्षात पुरुषाच्या बरोबरी असलेले स्थान दिसून येते. भारतातील उत्तराखंड राज्याचा विचार करता असे लक्षात येते की, "The gap between men & woman Voters has narrowedover time with a difference of 16.7% in 1962 to 4.4% in 2009"

स्त्री–पुरुषामधील दोन वेगवेगळया वर्षातील तफावत टक्केवारी पाहता असे निदर्शनास येते की, पूर्वीच्या काळापेक्षा स्त्रीवर्गातील उन्नती लक्षात येते. असे म्हणायला हरकत नाही. पण समाजात वावरत असतांना ग्रामीण स्त्रियांवर घेणारे अत्याचार त्यांच्या स्वातंत्र्याची होत असलेली गळचेपी पाहता अजूनही स्त्रीपुढे वेगवेगळया प्रकारची आव्हाने असल्याचे लक्षात येतात. ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

**ग्रामीण स्त्रियांपुढील आव्हाने**

१. पुरुषी मानसिकतेतून, गुलामगिरी व जखडातून स्वतःला मुक्त करणे व पुरुषाबरोबरीचा दर्जा प्राप्त करुन समाजात मानाचे स्थान निर्माण करणे.

२. समाजात सर्वत्र स्त्रीपोषक वातावरण निर्माण करुन स्वतःमध्ये आत्मनिर्भरपणा निर्माण करणे पुरुषाच्या कार्यात देश विकासासाठी हातभार लावणे व अंधारमय जीवनातून स्वतः प्रकाशमय जीवनाकडे झेप घेणे.

३. धाक, भिती, दडपशाही मनातून कायमची घालवून समाजाचा जबाबदार घटक बनणे व समाजाला योग्य दिशा देणे समाजात परीवर्तनाची लाट आणून समाजकांती घडविणे, अंधश्रध्दा, रुढी–परंपरा यांना शह देऊन परीवर्तनाची वाट स्विकारणे.

४. ग्रामीण भागातून राजकीय नेतृत्त्व निर्मितीसाठी शासनाने विविध प्रकारची प्रशिक्षणे घ्यावीत.

५. राजकारणातील कियाशील महिलांमध्ये शहरी भागात राहणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण शहरी भागांप्रमाणेच ग्रामीण भागामध्ये वाढणे गरजेचे आहे.

६. ज्याप्रमाणे राजकीय आरक्षण धोरणामुळे महिलांचा राजकारणात सहभाग वाढला. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यात त्याचा सहभाग वाढल्यास समाज अधिक सुदृढ बनेल. त्यातून देशाचा विकास घडून येण्यास मदत ।मळल.

७. सरकारी स्तरांवर महिला सक्षमीकरणाचे कार्यकम राबवून महिला हया अबला नसून सबला आहेत, या जाणिवाचा विविध प्रसार माध्यमाद्वारे प्रसार घडविणे. अशाप्रकारे आव्हान स्विकारुन स्त्रियांनी कार्य केल्यास भविष्यात त्यांची खऱ्या अर्थाने उन्नती घडून समाजव्यवस्था अधिक सुदृढ बनेल, हे निश्चित

८. ग्रामीण स्त्रियांनी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द आवाज उठवून न्यायाची दाद मागावी व त्यासाठी तिने आपले सर्वस्वपणाला लावावे.

## निष्कर्ष

सर्वच देशाच्या विकासात स्त्रियांचा फार मोठा वाटा आहे. त्या देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणू शकतात. फक्त त्यांना त्याच्यामधील सुप्तगुणांची, नतृत्वाची आणि शक्तीची जाणीव होण्याची गरज आहे. ती जाणीव तिच्यामध्ये पुर्णपणे निर्माण झाल्यास तसेच पुरुषाप्रमाणे तिला समान हक्क, समान दर्जा व समान संधी मिळाल्यास सामाजिक, सांस्कृतिक तसेच राजकीय क्षेत्रात ती कुठेही कमी पडणार नाही. असे म्हणायला हरकत नाही आणि त्याचा प्रत्यय येणा–या काळामध्ये हळूहळू येऊ लागला आहे.

## संदर्भग्रंथ

१. स्त्री स्वत्वाचा शोध – अंजली कुलकर्णी, आकांक्षा प्रकाशन, नागपूर प्र. आ. 2010

२. https://en.m Wikipedia.org

३. State wise voter Turnout in General Election 2014 (Government of India, 2014)

४. Chief Electoral officer "voting percentage in various Loksabha Election" Government of Uttarakhand India 22 march 2014

५. महिलांचे राजकीय सक्षमीकरण –डॉ.दीपक पवार, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर. प्र. आ. 2013

६. प्रतिबिंब (महिला समस्यांचा आत्मशोध) – संपादक डॉ.नीलकंठ भुसारी,डॉ.मीना निकम,

७. अथर्व पब्लिकेशन्स, धुळे प्र. आ. 2013